जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -२८७ दिनांक - १३/०७/२०२४**

विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमीत्त घेतलेल्या कार्यशाळेबाबत

दि.२६/०६/२०२४ " जागतिक अंमली पदार्थ विरोधी"दिनानिमीत्त विश्रांतवाडी पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थ विरोधी सप्ताह अंतर्गत जनजागृती अभियान राबविण्यात आले.सदर अभियान अंतर्गत दि.२६/०६/२०२४ ते दि.१२/०७/२०२४ रोजी दरम्यान १. नारायण ग्यानबा मोझे विदयालय, मुंजाबावस्ती, धानोरी, पुणे २. लोकमान्य टिळक हायस्कुल साप्रस,विश्रांतवाडी, पुणे ३. जनता हायस्कुल कस्तुरबा हौसिंग सोसायटी, विश्रांतवाडी, पुणे ४.विश्वभारती विदयालय,लेन नं.१४,टिंगरेनगर,विश्रांतवाडी, पुणे ५. पुणे इंटरनॅशल स्कुल, लेन नं.१४,टिंगरेनगर,विश्रांतवाडी, पुणे. ६. धनेश्वर विदयाल, मुंजबावस्ती, धानोरी, पुणे. ७.डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी माध्यम, हायस्कुल, भैरवनगर, धानोरी, पुणे ८. डॉ.मारथोफिल्यस स्कुल, धानोरी, पुणे ९.रश्मी इंग्लिश स्कुल, आळंदी रोड, विश्रांतवाडी, पुणे १०. ट्रिनिटी स्कुल, माळवाडी, कळस, पुणे या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता ०८ ते इयत्ता १२ वी चे विदयार्थ्यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यशाळे दरम्यान विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती कांचन जाधव,पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री.शंकर साळुंखे सहा.पोलीस निरीक्षक, अन्सार शेख शरद माळी पोलीस उप निरीक्षक,सत्यवान गेंड पदमराज गंपले, सुधा चौधरी,निशीगंधा शिंगे गोपनिय पथकाचे पोलीस अंमलदार गणेश पारडे दामिनी मार्शल तसेच मुक्तांगण व्यसनमुक्ती संस्थाकडील संचालिका श्रीमती मुक्ता पुणतांबेकर, जनजागगृती विभाग प्रमुख श्री.निहार हसबनीस, समुपदेश श्री.दत्ता श्रीखंडे, श्री.मंगेश कराळेकर, श्री.वैभव देवकर, श्री.माधव कोल्हटकर, श्री.मिरज शिवडे, मंदार शेट्टी, श्रीमती प्राजक्ता पेंडसे यांचे मदतीने विदयार्थांना व्यसनापासुन होणारे दुष्परिणाम, व्यसनामुळे आपले परिवार व शरीरावर होणारे परिणाम,व्यसनामुळे वाढत असलेली बालगुन्हेगारी, बाल लैंगिक अत्याचारकायदया अंतर्गत येणारे बाल हक्क व संरक्षण, वाहुतक नियम, सायबर क्राईम, सोशल मिडीया, ०१ जुलै २०२४ पासुन अंमलात आलेला भारतीय न्याय संहिता २०२३ कायदा, पोलीस काका आणि पोलीस दिदी, डायल ११२, महिला हेल्प लाईन १०९१,१२९१ तसेच सायबर तक्रार हेल्प लाईन १९३० याबाबत मार्गदर्शन करुन विदयार्थांशी संवाद साधण्यात आला. सदर अभियाना अंर्तगत एकुण शाळेतील २००० ते २५०० विदयार्थी,प्रिन्सिपल,मुख्याध्यापक तसेच शिक्षक सहभागी झाले.

सदर अंमली पदार्थ विरोधी सप्ताह अंतर्गत जन-जागृती अभियान हे मा. पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.अमितेशकुमार,मा.पोलीस सह आयुक्त.श्री.रंजनकुमार शर्मा मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.मनोज पाटील,मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०४, श्री.विजयकुमार मगर,मा.सहा.पोलीस आयुक्त खडकी विभाग,श्रीमती आरती बनसोडे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्रांतवाडी पोलीस स्टेशन श्रीमती कांचन जाधव यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले.